# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२० सप्टेंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

# स्वत:च्या भावाला जखमी करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने ठोठावली शिक्षा

पोलीस स्टेशन दुर्गापुर अंतर्गत स्वत:च्या भावाला मारहाण करणाऱ्या आरोपीस १९/०९/२०१९ रोजी **कु. एस.एस.कुलकर्णी कोर्ट क्र. ०४ जेएमएफसी चंद्रपुर यांनी दंडाची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन दुर्गापुर अंतर्गत राहुल नगर तुकुम चंद्रपुर येथे दिनांक ०५/०३/२०१३ रोजी **आरोपी नामे अरविंद विठ्ठल श्रीरामे वय ३५ रा. राहुल नगर तुकुम चंद्रपुर** याने आपल्या सख्या भावाला शुल्लक कारणावरून झगडा भांडण करून मारहाण केली अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. १९/२०१३ कलम ३२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन सफौ. सुधाकर गडपल्लीवार पोलीस स्टेशन दुर्गापुर यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १८/०९/२०१९ रोजी **आरोपी नामे अरविंद विठ्ठल श्रीरामे वय ३५ रा. राहुल नगर तुकुम चंद्रपुर, यास फिर्यादीच्या जखमी पतीस १०,०००/—रू नुकसान भरपाई म्हणुन देण्याचे दंड न भरल्यास ३ महिना शिक्षा कु. एस.एस. कुलकर्णी कोर्ट क्र. ०४ जेएमएफसी चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. कु. निलीमा काळे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. अनिल आकुलवार यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————————